"Vyatha"
Shrimati Zagade

# १. व्यथा

दीस बुडाला की कामावरून निगावं, घरच्या वाटंला लागाव. जवा पायजे आसंल तवा मीठ, मिरची, नाइतर मिलो घ्यावा आन् घरी यावं. जीव आसा झाला असतो, वाटतं कंबरूण घ्यावं आन् आस्सं पडून ऱ्हावं ... दीसभर काम करून घरी यावं आन् परत सहासात जणांचं राधावं.

'पर सुटका काई नाई !'

आसं आपलं दरदिसी सोताशी बोलावं आन् रांदायला घ्यावं की ठरलेलंच.

'आये, बाबा आला बग' पोरांनी गलका करावा की मग हाईच रोजचा तमाशा.

सांज झाली की सगळंच भ्या वाटाया लागतं. पाच लेकरं, आमी दोगं. मिलकत किती ? तर दोनसे आणि वर वीस आन् या म्हागाईच्या दिवसात तेवी कुठवर पुरतय. आन् त्याच्यात ह्येचा हा दारूचा नाद.

ह्यानं यावं अक्षी बक्कळ पिऊन. सुरुवातीला पोरांना काय कळतंय्.

बाप आला की बापानं काई खायाला आनलं आनलं म्हणून धावत जायची. पर ह्येला त्येची तरी सुद असायची का ? योकदा माली म्हनली, बाबा, तुमचंच म्हंत्स की रिबन्या आनील, आणि काई आनत नाईस.' तसं इतकं मारलं तिला की मला वाटलं मरतीयाच् आन् म्या सोडवायला गेले तर मला बी दोन रट्टं घातलं. पोरं आशी भितात. बाप कवा झोपतूय नाहीतर घराबाहेर जातूय याचीच वाट बगतात जनू. सगळं हासनंच गेलं घराचं.

बक्कळ वाटतं की सौंसार सोडावा पर त्यो काय सोडता यीतो का ?

पूर्वी कसं रोजाचं पैसं अगदी माझ्याजवळ द्यातं आन् मागून घ्यावं काय बिडीकाडीला लागलं तर.

जानेवारी १९

पर आता सगळंच बिनसलं–

पैसा मागितला तर श्या द्यावं. अंगावर धाऊन यावं आन् मारावं बी. मल तर रात रात डोळ्याला डोळा लागत नाही. आदी वाटायचं मरन यील तर चांगल पण आता त्येबी पटत नाई. ही पाच पोरं, ह्यो नवरा. काय मरनानं संपनार हा का सगळं ?

आता तो दारू पितो त्यात त्याचा तरी काय दोस म्हनावा ? कशाचा दो म्हनवा तेबी कळना झालंय.

गेल्या पाच वरसात म्हागाई अशी वाढली की तिला मरीआई का व्हत न कोनास ठाव ? मालकाला म्हनावं ' मालक, एवढं कस्ट करतो तर आरं रोज कि कमी देतोस ? ते बी बायांना यीगळं आन् पुरुसांना यीगळं ! त्यो काय आमा पुरतं वय ? आमी बी मानूसच हाय ! पन त्याला कसली हो दयामाया ?

ह्यो आधी चांगला वता. पन् पुडे म्हागाई आली. काई येळेला शेता काम मिळे तर काई येळेला घरीच बसावं. पैसा पुरंना. काई येळला फकस्त पोरा खायला द्यावं आन् दोगानी निस्तं पानी पिऊन झोपावं अशी तऱ्हा. दुस्काळात कसं केलं त्ये आमचं आमा ठावं. मालकाकडून कर्ज काडलं त्येबी फिटना मग केलं त्यानं पीनं. मला त्येला बी वाईट म्हंता येत नाय आन् काई सुदरत बी ना

तीन ' प्वारानंतर म्या म्हनलं व्हतं ' आता नको मूल म्या आप्रीसन क येते. ' तर ह्यो म्हनला ' त्ये देवाची देनं हाई... म्या काय पुरुस नाई का त्ये पोसायला ! आता त्यो देव कुटं झोपलाय मसनात काय की बाई. आनी ह्यो मा पुरूसबी दारू पिऊन सूद घालवून बसतो.

या पोरींची कधीतरी लग्नं करावीच लागनार. पोरांना बी शिकवायचं ह आपलं जिनं कश्याला त्येना ? पर ही दारू... कसा वाघावानी होता हा मर्द आता पार ढासळत चाललाय. त्यो ढासळतो, त्याबराबर हीकडं सौंसार ढासळतोच.

किती बार समजावलं आरं पोरांकडं बग. त्येंच्यासाठी तरी पिनं सोड- तुलाच तुज्या तब्येतीपायी काम मिळनार नाई. नायतर पर यक नाई आन् नाई. आता माज्या रोजावर कर्ज फेडू कसं ? पोरांना शिकवू कसं ? आनी भागवू कसं ?

ह्ये दुखं माज एकटीचंच नाय. साऱ्या वस्तीवर एक बी न पीनारा सापडायचा नाई औसदाला. काय कराव ते बी समजत नाई. वाटतं बायांनीच व्हऊन भट्टचा मोडून टाकाव्या. आनि मालकाला शाप बजावावं 'ह्ये बघ, आ

कस्टाचं धान्य सगळं तू नागोबा गिळतूंयास. आमच्या कस्टावर पीक घितुयास. आमाला घरटी काईतरी दर मईन्याला धान्य देत जा. पगार बी वाडव. आमच्या पोटाकडेही जरा बघ. नाईतर तुजं भलं होणार नाई.

म्या परवा सारजाला ह्ये बोलले. तिला बी पटलं. नंतर विठाला, रूक्मिणीला, सीताबाईला साऱ्यांनाच पटलं. उद्या वस्तीतल्या बाया एके ठिकाणी जमणार आहेत काय करावं ते ठरविण्यासाठी. बघू या काय व्हतं ते..

✦ ✦

## माझ्या नवऱ्यानं सोडलिया दारू ग

आनंद झाला, माझ्या मनाला,
    माझ्या मनाला ग --
सोन्याचा दिस आज उगवला हाय ग
    सोन्याचा दिस आज हाय ग
माझ्या नवऱ्यानं सोडलिया दारू ग
    बाई स्त्री मुक्ती मला पावली ग
जशी तिवाडी फिरवीत भवऱ्याला,
तशी दारू ग घुमवीत दादल्याला,
सुखाचा ग सारा संसार आमचा,
धुळीला मिळून गेला ग.
    आता नवऱ्यानं सोडलिया दारू ग ऽ
    बाई स्त्री मुक्ती मला पावली ग
चिल्या पिल्यानो, यारे भरभर,
फोडू या नारळ देवाला,
    बुद्धीचा भोपळा हाडाचा सापळा
    हातात आपल्या गावलाय रं...
माज्या नवऱ्यानं सोडलिया दारू ग
बाई स्त्री मुक्ती मला पावली ग

—श्रीमती झगडे